# राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा (एनएफएसए), 2013 च्या कलम 10 खाली सवलतीच्या दरात धान्य मिळण्यास पात्र असलेल्या कुटुंबांची निवड करण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे

## I. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा (एनएफएसए) म्हणजे काय?

तमाम जनतेला माफक दरात पुरेसे दर्जेदार अन्न पुरवून सन्मानजनक जीवन जगून मानवी जीवन शृंखला अबाधितपणे चालू राहावी म्हणून अन्न व पौष्टिक सुरक्षा तसेच इतर तत्सम गोष्टी पुरविणे हा या कायद्याचा मुख्य हेतू आहे.

एनएफएसए च्या विभाग 4 कलम 10 नुसार राज्य सरकारने खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याची गरज आहे. या कायद्याचा लाभ मिळणारी प्राधान्य कुटुंबे निश्चित करण्यासाठी लागणारी मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे असतील –

एनएफएसएच्या विभाग, 4 कलम 10 त म्हटले आहे की,

कलम 9 मध्ये निर्देशित केलेले ग्रामीण व नागरी भागातील लोकांचे प्रमाण राज्य सरकार ठरवील.

(अ) कलम 3 च्या उपकलम (I) खाली दिलेल्या प्रमाणानुसार आणि योजनेला लागू असलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अंत्योदय अन्न योजनेखालील पात्र कुटुंबांची निवड करण्यात येईल.
(ब) राज्य सरकार तयार करील त्या मार्गदर्शक तत्वानुसार सार्वजनिक वितरण पद्धतीखाली उर्वरित निर्धारित प्राधान्य कुटुंबांची निवड करण्यात येईल.

## II. प्राधान्यक्रम कुटुंबांची निवड (पीएचएच)

खाली दिलेले पात्र निकष पूर्ण करणारी कुटुंबे एनएफएसए कायद्याखालील यादीत समावेश करण्यास पात्र मानण्यात येतील

**तक्ता -1**

| **अ. क्र.** | **विभाग I**<br>**निकष** | **विभाग II**<br>**व्याख्या** | **विभाग III**<br>**निकषास पात्र ठरण्यासाठी लागणारी कागदपत्रे ***  |
|---|---|---|---|
| 1. | अंत्योदय योजना (एएवाय) | नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार खात्याने दिलेली एएवाय रेशनकार्डे असलेली सर्व कुटुंबे | नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार खात्याने दिलेले एएवाय रेशनकार्ड |
| 2. | दारिद्र रेषेखालील (बीपीएल) योजना | नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार खात्याने दिलेली बीपीएल रेशनकार्डे असलेली सर्व कुटुंबे | नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार खात्याने दिलेले रेशनकार्ड किंवा ग्रामीण विकास खात्याने दिलेली कार्डे |
| 3. | रु. 50 हजार पेक्षा कमी उत्पन्न असलेले कुटुंब | एकूण वार्षिक उत्पन्न रु. 50 हजारपेक्षा कमी असलेली, ग्रामीण विकास खात्याने मान्यता दिलेली सर्व कुटुंबे | महसूलखाते / एखादा राजपत्रित अधिकारी याने दिलेला उत्पन्नाचा दाखला / कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 50 हजारपेक्षा कमी असल्याचे दाखविणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि जात जनगणना (एसईसीसी) अहवालाची प्रत. |
| 4. | अनुसूचित जमाती (एसटी) | अनुसूचित जमात कल्याण खात्याने अनुसूचित जमात कुटुंब म्हणून जाहीर केलेले आणि वार्षिक उत्पन्न रु. 50 हजार पेक्षा कमी असलेले कुटुंब | सक्षम प्राधिकारणीने दिलेला अनुसूचित जमात दाखला आणि महसूल खाते / राजपत्रित अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला |
| 5. | अनुसूचित जाती (एससी) | अनुसूचित जमात कल्याण खात्याने अनुसूचित जाती कुटुंब म्हणून जाहीर केलेले आणि वार्षिक उत्पन्न रु. 50 हजार पेक्षा कमी असलेले कुटुंब | सक्षम प्राधिकारणीने दिलेला अनुसूचित जातीचा दाखला आणि महसूल खाते / राजपत्रित अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला |
| 6. | हंगामी निवासी | गृहहीन किंवा तात्पुरत्या निवासात राहणारे | हंगामी निवासात राहणारे कुटुंब म्हणून नोंद दाखविणारा आर्थिक सामाजिक आणि जात जनगणना (एसईसीसी) अहवालाचा सारांश |
| 7. | झोपडपट्टी | शहर नगरनियोजन खात्याने झोपडपट्टी म्हणून जाहीर केलेल्या घरात राहणारी सर्व कुटुंबे | कुटुंब राहात असलेले घर झोपडपट्टी म्हणून नोंद दाखविणारा आर्थिक सामाजिक आणि जात जनगणना (एसईसीसी) अहवालाचा सारांश |

| | | | |
|---|---|---|---|
| 8. | कच्चे घर / झोपडी | कच्चे घर किंवा झोपडीत राहणारी सर्व कुटुंबे | कच्चे घर / झोपडीत कुटुंब राहत आहे अशी नोंद असलेला आर्थिक सामाजिक आणि जात जनगणना (एसईसीसी) अहवालाचा सारांश |
| 9. | फेरवसणूक आणि पूनर्वसन | पूनर्वसन मंडळ (जीआरबी) किंवा जलस्रोत खात्याने (डब्ल्यूआरडी) फेरवसणूक आणि पूनर्वसणूक क्षेत्र म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रात राहणारी सर्व कुटुंबे | गोवा पूनर्वसन मंडळ (जीआरबी) किंवा जलस्रोत खात्याने (डब्ल्यूआरडी) दिलेल्या प्रदानपत्राची प्रत |
| 10. | दयानंद सामाजिक सुरक्षा योजना (डीएसएसएस) | समाज कल्याण खात्यातर्फे दिल्या जाणाऱ्या दयानंद सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभार्थी सदस्य असलेली सर्व कुटुंबे | समाजकल्याण खात्याचे मंजुरीपत्र / कार्ड |
| 11. | गृह आधार (जीए) | महिला आणि बालकल्याण खात्यातर्फे दिल्या जाणाऱ्या गृह आधार योजनेचा लाभार्थी असलेली सर्व कुटुंबे, ज्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न रु. 50 हजारपेक्षा कमी आहे | महिला आणि बालकल्याण खात्याचे मंजुरीपत्र आणि महसूल खाते / राजपत्रित अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला |
| 12. | तृतियपंथी / एचआयव्ही / एडस् रुग्ण | कोणतेही कुटुंब ज्यात एखादा तृतियपंथी / एचआयव्ही / एडस् रुग्ण राहात असल्यास | गोवा राज्य एडस् नियंत्रण सोसायटीने दिलेले सूचनापत्र (जीएसएसीएस) # |
| 13. | शारीरिक / मानसिक अपंग | कोणतेही कुटुंब ज्यात एखादा सदस्य शारीरिक किंवा मानसिक अपंग म्हणून घोषित केलेला आहे | सक्षम प्राधिकारिणीने दिलेला अपंगत्व दाखला |
| 14. | एकाकी महिला अवलंबितासह | एकाकी अविवाहित महिला किंवा विधवा किंवा घटस्फोटीत महिला कुटुंबप्रमुख असलेले कुटुंब आणि/ किंवा ज्या कुटुंबात अवलंबित आहेत असे कुटुंब ज्यांचे वार्षिक उत्पन्न 1.2 लाखापेक्षा कमी आहे | महसूल खाते / राजपत्रित अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला आणि कुटुंबात अवलंबित असलेली / नसलेली एकाकी महिला असल्याचे निवेदनपत्र |
| 15. | अनाथ व अल्पवयीन | घरात वडीलधारी नसलेले अनाथ किंवा अल्पवयीन प्रमुख असलेले कुटुंब | अनाथ किंवा अल्पवयीन कुटुंबप्रमुख असल्याचा राजपत्रित अधिकाऱ्याचा दाखला |
| 16. | अकुशल कामगार गट | अकुशल कामगार म्हणून काम करणारे कुटुंब, मच्छिमारी व भंगारअड्ड्यासह | स्वतःचे निवेदन |
| 17. | आश्रयहीन | आश्रय नसलेल्या व्यक्तिंना आश्रय देणाऱ्या संस्था / संघटना | सरकारी नोंदणीकृत किंवा विश्वस्थव्यवस्था इत्यादींनी स्थापन केलेल्या संस्था / संघटना, उदा. अपना घर, वृद्धाश्रम. |

* अर्जदाराने स्वतःच प्रमाणित केलेली कागदपत्रे स्वीकारली जातील.

# गोवा राज्य एडस् नियंत्रण सोसायटीच्या (जीएसएसीएस) अहवालानुसार, खाते या गटाचा स्वतःहून प्राधान्य गटात समावेश करेल. लाभधारकानी अर्ज करण्याची गरज पडणार नाही.

तक्ता 1 मधील अर्जदारानी (अनुक्रमांक 3, 4, 5 आणि 14 वगळता) उत्पन्नाचा दाखला देण्याची गरज भासणार नाही. उत्पन्न, व्यवसाय आणि पात्रता यादीतून वगळण्यात आलेले नाहीत याविषयीचे स्वप्रमाणपत्र पुरेसे असेल. गरज पडली तर सरसकटपणे काही अर्जांची किंवा तक्रार असलेल्या अर्जांचीच छाननी केली जाईल. आसरा नसलेले, एकाकी महिला, सुरक्षा नसलेली मुले, रोजगार नसलेली मुले इत्यादी गटांच्या बाबतीत स्वप्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. तक्ता 1 मधील अ. क्र. 3, 4, 5 आणि 14 मधील अर्जदारांना उत्पन्नाचा पुरावा सादर करावा लागेल.

## III. अग्राह्य ठरविण्याचे निकष

खाली दिलेल्या गटात येणाऱ्या कुटुंबाना प्राधान्य कुटुंबे गटातून वगळण्यात येईल.

(i) वार्षिक उत्पन्न रु. 50 हजारपेक्षा अधिक असलेली कुटुंबे (अनुक्रमांक 3, 4, 5 आणि 14 या गटातील कुटुंबानाच लागू)

(ii) कुटुंबातील एखाद्या सदस्याकडे हलके वाहन असल्यास (चारचाकी)

(iii) कुटुंबाचा एखादा सदस्य केंद्र / राज्य सरकार, स्थानिक स्वराज संस्था, महामंडळ / केंद्र / राज्य / स्थानिक सरकार किंवा सरकारकडून अनुदान मिळणाऱ्या संस्थेचा कर्मचारी असल्यास, रोजंदारी किंवा कंत्राटी कामगार वगळून.

(iv) घराला 4 किलो वॅट पेक्षा अधिक क्षमतेचा वीज पुरवठा असल्यास (संघटना / संस्थाना लागू नाही).

(v) तक्ता 1 मधील अ. क्र. 17 खाली येणाऱ्या लाभार्थींना यापैकी कोणतेच तत्व लागू होणार नाही.

## IV. पात्रतेसाठी पुरावा म्हणून सादर करावी लागणारी कागदपत्रे

(i) तक्ता 1 मधील कोणत्याही गटासाठी नमूद केलेले प्रमाणपत्र

(ii) कुटुंबातील सर्व सज्ञान सदस्यांची निवडणूक ओळखपत्र प्रत.

(iii) कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधारकार्ड प्रत (उपलब्ध असेल तेथे)

(iv) अर्जदाराला बँक खात्याचा तपशील द्यावा लागेल.

(v) आधारकार्डावर दिलेल्या पत्त्यावर तिचा निवास नसल्यास, अर्जदाराचा निवास दाखला (सध्या रेशनकार्ड असल्यास आणि संस्था / संघटनाना ही अट लागू नाही).

(vi) रेशनकार्ड असल्यास त्याची फोटो प्रत.

(vii) वगळण्यात आलेल्या कोणत्याही गटात अर्जदार येत नाही, असे विहित नमुन्यातील निवेदनपत्र.

(viii) सरकारने आदेशान्वये निर्धारित केलेल्या कालमर्यादेत अर्जदाराला घरातील सर्व सज्ञान सदस्यांचे बायोमेट्रीक्स् सादर करावे लागतील. अशाप्रकारे निर्धारित कालमर्यादेत बायोमेट्रीक्स् सादर न करणाऱ्या कुटुंबांना, बायोमेट्रिक्स् सादर करेपर्यंत प्राधान्यगट किंवा एएवाय गटातून वगळण्यात येईल.

## V. अर्ज कसा करावा

राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा 2013 तील तरतुदीनुसार सवलतीच्या दरात धान्य देण्यासाठी तयार करणाऱ्या पात्रता यादीत कुटुंबांचा समावेश करण्यासाठी, जाहीर सूचना देऊन लोकांकडून अर्ज मागविण्यात येतील.

कुटुंबातील ज्येष्ठ महिलेला कुटुंब प्रमुख मानण्यात येईल (एचओएफ). (हा नियम संस्थांना लागू नाही. संस्थेचा प्रमुख असणाऱ्या अधिकाऱ्याला कुटुंब प्रमुख मानण्यात येईल.) सरकारने निर्धारित केलेल्या नमुन्यात अर्ज सादर करावा लागेल.

## VI. अर्ज सादर करण्याचे स्थळ

संबंधित तालुक्यातील नागरी पुरवठा खात्याच्या कार्यालयात आणि / किंवा ग्रामपातळीवरील स्थानिक स्वराज संस्थेच्या कार्यालयात अर्ज स्वीकारले जातील. हे अर्ज ऑनलाईन करता यावेत म्हणून मदत करण्याचे प्रयत्न करण्यात येईल.

## VII. पात्र प्राधान्य कुटुंबाना मान्यता आणि अंतिम यादी तयार करण्याची पद्धती.

(i) अर्जांची छाननी करण्यात येईल. अर्जदार आणि / किंवा कुटुंबातील इतर सदस्यांची छायाचित्रे आणि डेमोग्राफिक तपशील परत मिळवावा लागू नये म्हणून आधारकार्ड किंवा सरकारकडे उपलब्ध असलेल्या इतर माहितीचा वापर करून अर्जदार आणि कुटुंबातील इतर सदस्यांची माहिती घेण्यात येईल. त्यामुळे बनावट किंवा बोगस कार्डांना वाव राहणार नाही.

(ii) गरज तेथे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येईल.

(iii) एखादे कुटुंब पात्र आहे असे जाहीर करण्यापूर्वी या कुटुंबाचा पात्र कुटुंब गटात आपण समावेश करू इच्छितो अशी जाहीर सूचना तालुका अधिकारी काढून ती आपल्या खात्याच्या सूचना फलकावर आणि खात्याच्या संकेतस्थळावर किमान सात दिवस पूर्वी प्रसिद्ध करेल.

(iv) पात्र कुटुंबांच्या गटातील यादीतील एखाद्या नावाला कोणाला हरकत घ्यायची असल्यास यादी प्रसिद्ध झाल्यावर सात दिवसांच्या आत तालुका अधिकाऱ्याकडे हरकत नोंद करावी लागेल. तालुका अधिकारी या हरकतीवर विचार करील. अशा हरकतीला प्रतिसाद म्हणून एखादा अर्ज फेटाळण्यापूर्वी संबंधित अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतले जाईल.

(v) हरकतीचा अर्ज निकालात काढल्यावर तालुका अधिकारी अर्जदार कुटुंबाच्या नावाचा समावेश पात्र कुटुंब गट यादीत करेल.

(vi) अशा पद्धतीने तयार करण्यात आलेली यादी (त्या स्थानिक स्वराज संस्थेपुरती) नागरी पुरवठा खात्याचा तालुका अधिकारी, संबंधित स्थानिक संस्थेकडे त्यांचे मत व हरकती जाणून घेण्यासाठी पाठवेल. सदर स्थानिक स्वराज संस्थेला ही यादी किमान सात दिवस खुली ठेऊन हरकती मागवाव्या लागतील. त्यानंतर या सूचना आणि हरकती स्थानिक स्वराज संस्थेच्या कार्यकारी मंडळासमोर ठेऊन हरकतींवर त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन तालुका अधिकाऱ्याला शिफारस करावी लागेल. तालुका अधिकाऱ्याकडून यादी मिळाल्यानंतर स्थानिक स्वराज संस्थेला आपल्या हरकती, सूचना आणि शिफारसीसह 30 दिवसांच्या आत यादी परत पाठवावी लागेल. वर उल्लेखित मुदतीत यादी परत पाठविण्यास स्वराज संस्थेला अपयश आल्यास, स्थानिक स्वराज संस्थेच्या कोणत्याही हरकती किंवा सूचना नाहीत, तसेच तालुका अधिकाऱ्याने तयार केलेल्या यादीची स्थानिक स्वराज संस्थेने शिफारस केली आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

(vii) स्थानिक स्वराज संस्थेकडून यादी मिळाल्यानंतर यादी हरकतीसह आलेली असल्यास, तालुका अधिकारी संबंधित पक्षकारांचे म्हणणे ऐकून हरकती निकालात काढेल व 15 दिवसांच्या आत अंतिम यादी प्रकाशित करेल.

## VIII. एनएफएसए लागू करण्याची पद्धती

(i) सरकार अधिसूचित करेल त्या तारखेपासून पात्र कुटुंबाना सरकारने निर्धारित केलेल्या दराने निर्धारित धान्याचा कोटा दिला जाईल. दुकानाना त्या प्रमाणात धान्य दिले जाईल आणि त्याप्रमाणे धान्य दुकानदाराना कळविले जाईल.
(ii) अशा पद्धतीने निश्चित करण्यात आलेल्या पात्र कुटुंबांची रेशनकार्डे छापली जातील किंवा टप्प्याटप्प्याने नव्याने स्मार्टकार्डे देण्यात येतील. नवीन रेशनकार्डे देण्यात येईपर्यंत सध्याच्या कार्डवर स्टॅम्प मारून योग्य त्या गटात म्हणजे एएवाय किंवा प्राधान्य कुटुंब गटात एनएफएसए 2013 खाली ही कार्डे पात्र असल्याचे नमूद करण्यात येईल. या कार्डधारकांना सध्याच्या कार्डवरच निर्धारित धान्य मिळत राहील.
(iii) एनएफएसए कायद्यातील तरतुदीनुसार कुटुंबातील ज्येष्ठ महिलेचे नाव कुटुंब प्रमुख म्हणून नमूद करण्यात येईल आणि या नव्या रेशनकार्डाचे ''गोवा अन्न सुरक्षा कार्ड'' असे नामकरण करण्यात येईल.
(iv) कुटुंब प्रमुख आणि इतर सदस्यांचे छायाचित्र आणि इतर तपशील घेतला जाईल आणि/ किंवा यूआयडी किंवा एपिक कडून आयात करण्यात येईल. उपलब्ध असलेल्या सदस्यांची आधारकार्डे घेऊन त्यावरील माहिती डेटाबेसमध्ये घालण्यात येईल. कार्ड देण्यापूर्वी प्रत्येक कुटुंबाच्या प्रमुखाकडून, आपले कुटुंब वगळण्यात आलेल्या गटात येत नाही, असे निवेदन घेण्यात येईल.
(v) नव्या रेशनकार्डच्या डेटाबेसमध्ये आधारकार्ड क्रमांक (उपलब्ध असेल तेथे) कुटुंबातील सर्व सज्ञान सदस्यांचे एपिक (निवडणूक ओळखपत्र) क्रमांक (सक्तीचे) असतील. बनावटगिरी टाळण्यासाठी या माहितीचा वापर करण्यात येईल. खात्याने निर्धारित केलेल्या मुदतीत एपिकची प्रत न दिल्यास, किंवा अर्जात किंवा निवेदनपत्रात जाणूनबुजून चुकीची माहिती दिल्यास, आवश्यक ती माहिती देईपर्यंत अशा कुटुंबांची नावे एएवाय/ प्राधान्य गटातून बाहेर काढण्यात येतील.

## IX. सहाय्य कक्ष

अर्जदाराना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच अर्ज भरण्यास मदत करण्यासाठी प्रत्येक तालुका कार्यालयात सहाय्य कक्ष उघडण्यात येतील. हा सहाय्य कक्ष अर्ज आणि सोबत जोडलेल्या कागदपत्रांची प्राथमिक छाननी करेल आणि आवश्यक त्या कागदपत्रासह अर्ज सादर करण्यात अर्जदाराला मदत करेल. त्यामुळे मान्यता पद्धतीला चालना मिळेल आणि अर्जदाराचे त्रास कमी होतील.

## X. प्रसिद्धी आणि जागृती

एनजीओ, लोकप्रतिनिधी आणि इतर वेगवेगळ्या माध्यमांद्वारे जनतेकडे संपर्क साधण्यात येईल.

राज्यातील सामाजिक, आर्थिक आणि जात जनगणना, गृहहीन लोकांचे सर्वेक्षण आदी योजनात समावेश असलेल्या कुटुंबांशी संपर्क करून त्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा म्हणून प्रोत्साहन देण्यात येईल. या मार्गदर्शक तत्वांना भरपूर प्रसिद्धी देण्यात येईल.